# ठाणे स्मार्ट सिटी लि.

**(स्थापना दि. १८/१०/२०१६ CIN:U9309OMH2016GC286889)**

मा. पंतप्रधान महोदयांनी दि. २५/०६/२०१५ रोजी स्मार्ट सिटी मिशन योजनेची घोषणा केली. या योजनेमध्ये भारतातील एकूण १०० शहरांचा समावेश करण्यात आला आहे. या १०० शहरामध्ये महाराष्ट्रातील १० शहरांचा समावेश करण्यात आला. अभियानाची अमंलबजावणी करणेकरीता घेणेत आलेल्या प्रतियोगितेकरीता मे. क्रिसील रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सो.लि. यांची नेमणूक करुन स्मार्ट सिटी प्रपोजल तयार करण्यात आले. प्रतियोगितेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये ठाणे शहराची स्मार्ट सिटी मिशनकरीता निवड झाली. ठाणे स्मार्ट सिटी प्रपोजलमध्ये क्षेत्राधारीत विकास, पुर्नविकास तसेच पॅन सिटी सोल्युशन यांचा समावेश आहे.

क्षेत्राधारीत विकासामध्ये ठाणे रेल्वे स्टेशन परीसर (पूर्व व पश्चिम परिसर) नौपाडा, पांचपाखाडी, खारकर आळी, उथळसर या भागांचा समावेश असून त्यामध्ये मुख्यत्वे सॅटीस (ठाणे पूर्व), वॉटर फ्रन्ट (ठाणे स्टेशन ते कळवा ब्रिज), मेंटल हॉस्पिटल नजीक नवीन रेल्वे स्टेशन तसेच संपूर्ण क्षेत्रातील पायाभूत सुविधा, सौर ऊर्जा प्रकल्प यांचा अंतर्भाव आहे. पुर्नविकासामध्ये वागळे इस्टेट परीसर, किसननगरचा समावेश आहे. पॅनसिटी सोल्युशन्समध्ये वायफाय, स्मार्ट मिटरींग, डीजी कार्ड, सीसी टि.व्ही., बस करीता आयटीएमएस या गोष्टींचा अंतर्भाव आहे.

महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या स्मार्ट सिटी प्रपोजलचा एकूण खर्च सुमारे रु.५४०४ कोटी इतका असून त्यामध्ये क्षेत्राधारीत विकासाकरीता रु.५२३५ कोटी व पॅन सिटीकरीता रु. १६९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Project | Funding Source | Cost (In Rs. Crore) |
|---|---|---|---|
| ***Area Based Development (Rs. 5235 crores)*** | | | |
| 1 | New suburban station | Central Railways & Smart City Mission | 289 |
| 2 | Multi-modal facility | Smart City Mission | 267 |
| 3 | Teen Haath Naka junction improvement | Ministry of Road Transport & Highways | 239 |
| 4 | Parking management | Smart City Mission | 27 |
| 5 | Pedestrian improvements | Smart City Mission | 23 |
| 6 | Inclusive housing for 1 lakh population (cluster redevelopment) | Private financing | 3974 |
| 7 | 3 lakefront developments | Smart City Mission | 16 |
| 8 | 1.5km waterfront development | Smart City Mission | 224 |
| 9 | LED street-lighting | Private Financing | 27 |
| 10 | 2MW solar roofing | Private Financing | 14 |
| 11 | Water supply network remodelling | AMRUT | 35 |
| 12 | Sewerage works | AMRUT | 25 |
| 13 | Nalla works | AMRUT | 49 |
| 14 | Decentralized solid waste processing | Private Financing | 21 |
| 15 | Urban restrooms | Smart City Mission | 5 |
| ***Pan City (Rs. 169 crores)*** | | | |
| 16 | Digi-card | Smart City Mission | 28 |
| 17 | Enterprise resource planning | Smart City Mission | 12 |
| 18 | City-wide CCTV and Wi-Fi | PPP | 42 |
| 19 | Online performance monitoring | Smart City Mission | 83 |
| 20 | Intelligent transport system | Smart City Mission | 4 |
| **TOTAL** | | | **5404** |

ठाणे स्मार्ट सिटी अभियान राबविणेकरीता ठाणे स्मार्ट सिटी लि. (विशेष उद्देश वाहन- एस.पी.व्ही.) ची स्थापना दि.१८/१०/२०१६ रोजी करणेत आली. या कंपनीचे संचालक मंडळ खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | हुद्दा | अधिकारी / पदाधिकारी |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष (Chairman) | श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (महसुल विभाग) |
| २ | संचालक (Director) | पोलिस आयुक्त, ठाणे |
| ३ | संचालक (Director) | अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ४ | संचालक (Director) | जिल्हाधिकारी, ठाणे |
| ५ | संचालक (Director) | आयुक्त, ठाणे महानगरपालिका |
| ६ | संचालक (Director) | महापौर, ठाणे महानगरपालिका |
| ७ | संचालक (Director) | अध्यक्ष, स्थायी समिती, ठाणे महानगरपालिका |
| ८ | संचालक (Director) | सभागृह नेता, ठाणे महानगरपालिका |
| ९ | संचालक (Director) | विरोधी पक्षनेता, ठाणे महानगरपालिका |
| १० | संचालक (Director) | महासभेकडून नामनिर्देशित करण्यात आलेले |
| ११ | संचालक (Director) | महासभेकडून नामनिर्देशित करण्यात आलेले |
| १२ | संचालक (Director) | केंद्रीय कंपनी व्यवहार, मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या संचालकाच्या डेटा बँकमधून निवड करण्यात आलेले स्वतंत्र संचालक |
| १३ | संचालक (Director) | केंद्रीय कंपनी व्यवहार, मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या संचालकाच्या डेटा बँकमधून निवड करण्यात आलेले स्वतंत्र संचालक |
| १४ | संचालक (Director) | श्रीमती एस.व्ही.आर.रमणा, केंद्र शासन |
| १५ | कार्यकारी संचालक (Executive Director) | श्री. सुनील चव्हाण, मुख्य कार्यकारी अभियंता, ठाणे स्मार्ट सिटी लि. |

ठाणे स्मार्ट सिटी लि.च्या स्थापनेमध्ये ठाणे महानगरपालिका व शासन यांचे समसमान भाग भांडवल आहे. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेच्या ५० टक्के हिश्याकरीता खालील ६ भागधारक आहेत.

| अ.क्र. | भागधारक |
|---|---|
| १ | आयुक्त, ठाणे महानगरपालिका |
| २ | महापौर, ठाणे महानगरपालिका |
| ३ | उप महापौर, ठाणे महानगरपालिका |
| ४ | अध्यक्ष, स्थायी समिती, ठाणे महानगरपालिका |
| ५ | सभागृह नेता, ठाणे महानगरपालिका |
| ६ | विरोधी पक्षनेता, ठाणे महानगरपालिका |

शासनाच्या ५० टक्के हिश्याचे एकमेव भागधारक म्हणून विभागीय आयुक्त पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | भागधारक |
|---|---|
| १ | श्री. प्रभाकर कृष्णाजी देशमुख, विभागीय आयुक्त, कोकण विभाग |